<u>परिशिष्ट-II</u>

<u>खाजगी जागेवर मुर्ती घडविणा-या मुर्तीकारांनी मंडप बांधणीकरीता सादर करावयाचे हमीपत्र</u>

**सन २०२५ मधील मुर्ती घडविण्यासाठी लागणा-या मंडप उभारणीच्या परवागनीसाठी मुर्तीकारांनी सादर करावयाचे हमीपत्र.**

मी / आम्ही श्री. ______________________________ मुर्तीकार/मुर्तीकार संघ याव्दारे खालील बाबींची हमी देत आहे/आहोत –

१) मी/आम्ही स्वतः मुर्तीकार आहे/आहोत. याबाबीची खातरजमा / पडताळणी महापालिकेच्या अधिका-यांमार्फत केली जाईल हे मला/आम्हाला मान्य आहे.

२) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल PIL 96 of 2024 मधील दिनांक ३०.०१.२०२५ रोजीच्या अंतरीम आदेशानुसार, पीओपी मुर्तींना पूर्णपणे प्रतिबंध करण्यात आला असून सर्व मुर्ती शाडू/पर्यावरणपूरक साहित्याने घडवावयाच्या आहेत ही बाब मला/आम्हाला मान्य असून मा. उच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन करु/करेन.

३) मूर्ती रंगकामासाठी नैसर्गिक/पर्यावरणपूरक रंगाचा वापर केला जाईल.

४) महापालिकेकडून देण्यात आलेल्या परवानगीचा उपयोग मुर्ती घडविण्यासाठी केला जाईल व मूर्ती विक्रीसाठी सदर परवानगीचा वापर केला जाणार नाही हे मान्य आहे.

५) सन २०२५ च्या सार्वजनिक उत्सवांसंदर्भात केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत दि. १२.०५.२०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन केले जाईल तसेच मा. उच्च न्यायालय, पोलीस, व महापालिका यांचेमार्फत वेळोवेळी देण्यात आलेल्या आदेशांचे उल्लंघन झाल्यास कारवाईस पात्र ठरेन हे मला मान्य आहे.

६) खाजगी जागेवरील मूर्ती घडविण्याकरीता उभारण्यात येणा-या मंडपासाठी जागा मालकाची/सोसायटीची ना हरकत परिशिष्ट-IV सोबत जोडण्यात येत आहे.

(-------------------------------)
मुर्तीकारांचे नाव व स्वाक्षरी